अतारांकित प्रश्नोत्तरांची १०२ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक गावांचा आर्थिक व सामाजिक जनगणनेचा डाटा मॅपिंग न झाल्याबाबत

(१) २७५७ (१५-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक गावांचा सन २०११ च्या आर्थिक व सामाजिक जनगणनेनुसार डाटा मॅपिंग न झाल्यामुळे जिल्ह्यातील पात्र लाभार्थी शासनाच्या घरकुल व इतर विविध योजनांपासून वंचित राहिले असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाटा मॅपिंग करण्यासंदर्भात जिल्हास्तरावरून अनेकदा पत्र व्यवहार करून सुद्धा या कामात गती आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील ज्या गावांचे मॅपिंग झालेले नाहीत तेथील पात्र लाभार्थींना घरकुलाच्या ''ड'' यादीमध्ये प्राधान्य दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, डाटा म्यपिंग च्या कामास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१४-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

सर्व पात्र लाभार्थी प्रपत्र ड मध्ये समाविष्ट करुन आवास प्लस ऍप द्वारे त्या सर्व लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणाची कार्यवाही पूर्ण झाली असून लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तऱ्हाळा (ता. मंगरूळपिर, जि. वाशिम) ग्रामपंचायत कार्यालय व्यवसाय करवसुलीत कसूर केल्याबाबत

(२) ३२४२५ (२५-११-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तऱ्हाळा (ता. मंगरूळपिर, जि. वाशिम) येथील ग्रामपंचायत कार्यालय श्री देवा राठोड यांची प्रशासक म्हणून नियुक्ती झाल्यापासून ते पदोन्नती मिळेपर्यंत ग्रामसेवक व सचिव या पदावर कार्यरत असताना त्यांच्या कार्यकाळात त्यांनी शासकीय नियमाप्रमाणे ग्रामपंचायतीचे आर्थिक उत्पन्न वाढीसाठी व्यवसाय कर गोळा करणे, व्यवसाय करणाऱ्यांवर व्यवसाय कर आकारणे व ग्रामपंचायतसंबंधी इतर कर वसूली न केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त कालावधीत मग्रारोहयो च्या सिंचन विहीरीचा शेतकऱ्यांचा प्रस्ताव पाठवताना शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता १५ विहिरी ऐवजी १० प्रस्ताव पाठवून शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित ठेवले तसेच ग्रामस्थांनी गावाला पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या योजनेकरीता रोहित्र बसविण्याची मागणी केल्यानुसार वीज वितरण कंपनीने सदर रोहित्र चे पैसे भरण्याचे आदेश ग्रामपंचायतीला दिले असतानाही श्री देवा राठोड यांनी पैसे भरले नसल्याने ग्राम्रस्थांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्री देवा राठोड यांनी शासकीय कामकाजात केलेल्या दिरंगाईमुळे त्यांच्यावर शासनाने नमुना १ ते ४ तयार करून निलंबनाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाकडून चौकशी पथक नियुक्त करून उक्त प्रकरणाचा सखोल तपास करुन दोषी असणाऱ्या श्री देवा राठोड यांचे निलंबन करण्याची कारवाई करणेसह ग्रामपंचायतीचे करवसूली करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१६-०२-२०२२) : (१) अशंत: खरे आहे.

ग्रामपंचायत तऱ्हाळा येथील घरकर,दिवाकर व आरोग्यकर यांची सन २०२०-२१ मध्ये ८.९२ लक्ष आणि पाणीकर रु. १.४५ लक्ष वसूली असून त्यापैकी रु. ४६ हजार वसूली करण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दि. ०९.०२.२०२१ रोजी १० सिंचन विहीरींचे व दि. २५.३.२०२१ रोजी १६ सिंचन विहीरींचे प्रस्ताव ग्राम पंचायत, तऱ्हाळा कडून पंचायत समिती कार्यालय, मंगरुळपीर यांच्याकडे सादर केले होते. सदर प्रस्तावांची पंचायत समिती स्तरावर तपासणी केली असून सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्यामुळे प्रस्ताव ग्रामपंचायत, तऱ्हाळा यांच्याकडे परत पाठविला होता. सदर त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव फेरसादर करण्याबाबतची कार्यवाही ग्रामपंचायत तऱ्हाळा यांच्या स्तरावर सुरु आहे.

तसेच वीजेचे रोहित्र बसविण्याबाबत दि. २५.०५.२०२१ च्या ग्रामपंचायत तऱ्हाळा च्या मासिक सभेत चर्चा झाली आहे. तथापि विद्युत मंडळाकडून पैसे भरण्याबाबतचे आदेश ग्रामपंचायतीला मिळालेले नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे जिल्हयातील बांधकाम कामगारांच्या मागण्याबाबत

(३) ३२४८८ (०२-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयासह राज्यातील बांधकाम कामगारांची नव्याने नोंदणी करावी, नूतनीकरण करावे, बांधकाम मंजुरीसाठी स्वतंत्र कार्यालय सुरु करावे व शासनाने जाहीर केलेल्या सर्व योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी सहारा असंघटित इमारत बांधकाम मजदूर संघटनेने दिनांक ११ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बांधकाम मजुरांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०६-०६-२०२२) : (१) हे, खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामीण रुग्णालय खुलताबाद, (जिल्हा औरंगाबाद) येथे पद भरतीसह ट्रामा केअर युनिटची स्थापना करण्याबाबत

(४) ३३२४२ (१०-०१-२०२२). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण रुग्णालय खुलताबाद, (जिल्हा औरंगाबाद) येथे वैद्यकीय अधिकारी यांची ३ पदे मंजूर असून या मंजुर पदापैकी रिक्त असलेल्या एका पदावर वारंवार मागणी केल्यानंतर एक वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून देखील सदर अधिकारी अद्याप पर्यंत रुजू झालेले नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आल, हे खरे आहे काय,

(२) तसेच, येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्यात यावे याबाबत लोकप्रतिनिधी केलेल्या मागणीनुसार शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर प्रस्तावातील सर्व त्रुटींची पूर्तता केल्यानंतरही अद्यापही या प्रस्तावाला प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद येथे नेमणूक करुनही सदर पदावर रुजू न होण्या-या वैद्यकीय अधिकारी यांचेवर कारवाई करणेसह सदर रुग्णालयात ट्रामा केअर युनिटची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.१९०/ आरोग्य-३, दि.१८.०९.२०२० अन्वये ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. औरंगाबाद जिल्हयातील ग्रामीण रुग्णालय खुलताबाद येथील प्रस्तावित ट्रॉमा केअर युनिट हे सदर धोरणातील अटींची पूर्तता करत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाबाबत

(५) ३३५७० (०५-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील पूर संरक्षण भिंत व अतिवृष्टीच्या मुद्यांवर जिल्हा नियोजन समितीच्या बैठक दिनांक ९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास झालेले बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार जिल्हयातील नदी खोलीकरणाचा सविस्तर आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात पूर संरक्षण भिंत व जिल्हयातील नदी खोलीकरण करणे याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१६-०६-२०२२) : (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांचे पत्र क्र.जिवायो/इतीवृत्त/९६२/२०२१, दि.१३.१२.२०२१ अन्वये प्राप्त उपरोक्त बैठकीबाबतचे इतिवृत्त सोबत जोडण्यात येत आहे

(३) बुलडाणा मंडळांतर्गत एकूण ४८ पूर संरक्षण भिंती प्रस्तावित असून त्यापैकी ०५ प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. ०५ पैकी ०४ पूर संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आलेल असून उर्वरीत बांधकाम प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्ली (जि.भंडारा) तालुक्यात प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत मिळणा-या लाभापासून लाभार्थी वंचित असल्याबाबत

(६) ३५२७५ (०७-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्ली (जि.भंडारा) तालुक्यातील ३५ लाभार्थ्यांचीं प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत मिळणा-या लाभापासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वंचित लाभार्थी यांनी खंडविकास अधिकारी भंडारा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यांच्याकडे निवेदन दिलेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दखल घेऊन सिल्ली येथील ३५ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुल बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१५-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर ३५ लाभार्थी भूखंड नसलेले आहेत. त्यामधून २४ लाभार्थ्यांचे प्रस्ताव अतिक्रमण नियमानुकूल करण्याकरिता शक्तीप्रदत्त समितीकडे ठेवण्यात आले असून त्यातील १९ लाभार्थ्यांना मंजूरीची कार्यवाही करण्यात येत आहे व ५ लाभार्थी अपात्र यादीत आहेत. ऊर्वरित ११ जागा नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी किंवा जागा खरेदी साठी पंडित दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील जानाई शिरसाई योजनांच्या पाण्यावाचून टोकाकडील गावे दुर्लक्षीत असल्याबाबत

(७) ३५५५० (०५-०१-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) तालुक्याच्या पूर्व भागातील रिसे, पिसे, राजुरी नायगाव या गावांतील ग्रामस्थांचा शेतीचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी या गावांचा जानाई-शिरवाई योजनेत समावेश केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावे ही अगदी टोकाला असल्याने या गावांमध्ये पाणी येताना अनेकदा पाणी चोरीला जात असल्याने ही गावे पाण्यावाचून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खोपडेवाडी येथे पाणी सुरु असताना दौंड तालुक्यातील शेतकऱ्यांनी रिसे, पिसे येथील ठोंबरे वस्तीनजीक अचानक कॅनॉलचा भराव फोडल्याने पुरंदर तालुक्यात येणारे पाणीही बंद झाले अल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथे पाणीचोरी होऊ न देता येथील टोकांकडील गावांना सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०३-०६-२०२२) : (१) होय.
(२) हे खरे नाही.
खडकवासला प्रकल्पाचे एकूण वार्षिक प्रकल्पीय पाणी वापर ३३.७७ टी.एम.सी. असून प्रकल्प तरतूदीनुसार सिंचनासाठी २२.५५ टी.एम.सी. ची तरतूद आहे. त्यापैकी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी अनुज्ञेय पाणी वापर ३.६० टी.एम.सी. आहे. तसेच पुणे महानगरपालिकेसाठी (पुणे शहराच्या पिण्यासाठी) ८.३० टी.एम.सी. ची तरतूद आहे. परंतु पुणे शहराचा प्रत्यक्ष पाणी वापर हा प्रकल्प तरतूदीपेक्षा जास्त आहे. सन २०२०-२१ चा पुणे शहराचा प्रत्यक्ष पाणी वापर २०.२७ टी.एम.सी. होता. शासन नियमांनुसार पिण्याचे पाणी दिल्यानंतरच सिंचनाला पाणी देण्याची तरतूद असल्याने खडकवासला प्रकल्पात सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध असते. त्यामुळे जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेला प्रकल्प तरतुदीनुसार पाणी उपलब्ध होत नाही.उपलब्ध होणारे पाणी समन्यायी तत्वावर सर्व गावांना देण्यात येते. तथापि कोठेही पाण्याची चोरी झालेली नाही.
(३) हे खरे नाही.
टप्पा क्र.३ मधील पंपामध्ये बिघाड झाल्यामुळे आवर्तन कालावधी खंडीत झालेला होता. यास्तव शिल्लक वाया जाणारे पाणी जवळील शेतकऱ्यांना देण्यात आलेले आहे. तथापि शेतकऱ्यांनी कालव्याचा भराव फोडलेला नसून कालव्याला गेट नसल्याने जलसंपदा विभागाद्वारे कालव्याचा भराव बाजूला सारुन शेतीस पाणी देण्यात आले आहे. तसेच पंप दुरुस्त झाल्यानंतर कालव्याचा भराव पूर्ववत करुन रिसे-पिसे नजिक ठोंबरेवस्ती या गावातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेसे पाणी देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौ शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील चांदोली धरणातून वाहणाऱ्या वारणा उजवा व डावा तीर कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(८) ३६०१५ (०६-०१-२०२२). डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील चांदोली धरणातून वाहत असलेल्या वारणा उजवा व डावा तीर कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामूळे व गळतीमुळे तेथील शेतजमिन नापीक होत असल्याने सदर कालवा बंद करुन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत कराव्यात अशी मागणी तेथील शेतकऱ्यांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने प्रशासनाचे झालेले दुर्लक्ष झाले आहे, ही खरे आहे काय, धरणातून वाहत असलेल्या वारणा उजवा व डावा तीर कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामूळे व गळतीमुळे तेथील शेतजमिनी नापीक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले,

(४) असल्यास, उक्त् ठिकाणची कालव्याच्या पाण्यामुळे जमिन बाधीत होत असल्याने उक्त् कालवा बंद करुन प्रकल्प बाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०६-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

वारणा प्रकल्पाचे मंजूर तृतीय सुप्रमा अहवालानुसार वारणा डावा तीर कालवा लांबी १ ते ७० कि.मी. व वारणा उजवा तीर कालवा लांबी १ ते ६० कि.मी. इतकी मंजूर आहे. त्यापैकी उजवा कालवा १ ते ३० कि.मी. व डावा कालवा १ ते ३८ कि.मी. पूर्ण झाला असून नियमितपणे सिंचन आवर्तने सुरु आहेत.सदर दोन्ही कालव्याच्या पूर्ण झालेल्या लांबीमधील भरावाच्या भागात काही ठिकाणी गळती आढळल्याने स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी गळती थांबविणे संदर्भात उपाययोजना करणेबाबत मागणी केली होती. त्यानुषंगाने सदर भागामध्ये गळती प्रतिबंधक उपाययोजना म्हणून कालव्याच्या भरावाच्या भागामध्ये जीओसिंन्थेटिक अस्तरीकरण करणेत आले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत गळतीचे प्रमाण कमी आहे. प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत कराव्यात अशी मागणी शेतकऱ्यांनी केलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हा परिषदेतील शाखा अभियंत्याची पदे रिक्त असल्याबाबत

(९) ३६३५३ (०७-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील जिल्हा परिषदेतील शाखा अभियंत्याची पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे जिल्हयात सध्यस्थितीत जलजीवन मिशन योजनेची कामे सुरु असून या कामांचे प्रस्ताव तयार करणे तसेच इतर अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाखा अभियंता नसल्यामुळे कोटयावधी रुपयांच्या जल जीवन मिशनचे आराखडे तयार नसणे तसेच कामांचा परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन त्याला तांत्रिक व प्रशासकिय मान्यता घेण्यासंदर्भातील कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शाखा अभियंत्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०१-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) सन २०२० पासून कोविड - १९ या साथीच्या प्रसारामुळे राज्यात करावयाच्या वितीय उपाययोजनांतर्गत वित्त विभागाने त्यांच्या दिनांक ०४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये नवीन पदभरतीवर निर्बंध घातले असून सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व आरोग्य विभाग वगळता अन्य कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करू नये अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेमध्ये सरळसेवेने करावयाच्या भरतीऐवजी सद्य:स्थितीत केवळ कंत्राटी कर्मचा-यांची बाह्य स्त्रोताव्दारे नेमणूक केली जात आहे. पाणी पुरवठा विभागाच्या दि.१०/०२/२०२१ अन्वये प्राप्त सूचनांस अनुसरून, बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी कनिष्ठ अभियंता यांच्या तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका करून जलजीवन मिशन अंतर्गत कामे सुरू करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रधानमंत्री आवास योजनेतील "प्रपत्र ड" च्या यादीची
फेर तपासणी करण्याबाबत

(१०) ३६३८४ (०७-०१-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रपत्र ड च्या यादीची पंचायत समिती अंतर्गतच्या पडताळणीमध्ये अनेक पात्र लाभार्थ्यांना जाणीव पुर्वक अपात्र केल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यादीची पडताळणी करताना कार्यालयात बसून एकाच व्यक्तीने नावांची अंतिम यादी तयार केल्याने अनेक पात्र लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित राहावे असल्याने अनेक गरजू लोकाना घरकुल मिळणार नसल्याने प्रधानमंत्री आवास योजनेचे उदिष्ट सफल होणार नसून व सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे मिळणार नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व कृषी सहाय्यक या पांच सदस्यीय समितीच्या माध्यमातून मौका चौकशी करून फेर पडताळणीची आवश्यकता निर्माण झालेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पांच सदस्यीय समितीच्या माध्यमातून मौका चौकशीच्या अहवालावर प्रसिद्ध अंतिम अहवालावर अंतिम यादी प्रसिद्ध केल्यास त्यातून सर्वांना न्याय मिळेल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाच्या अनुषंगाने उक्त पाच सदस्यीय समिती स्थापन करण्याबाबत तसेच सदरहू समितीच्या प्राप्त अहवालानुसार अंतिम यादी प्रसिद्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. हसन मुश्रीफ (१४-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

कोरलवाडीतील (ता.पनवेल जि.रायगड) आदिवासी ग्रामस्थांना प्रवासाची होत असलेली गैरसोय

(११) ३७७६४ (१२-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरलवाडीतील (ता.पनवेल जि.रायगड) येथील आदिवासी ग्रामस्थांना रस्ता अभावी गैरसोय होत असल्यामुळे ३ कि.मी. रस्ता बांधण्याचा निर्णय २ वर्षापूर्वी जिल्हा परिषदेणे मंजूर करुन त्यासाठी साडेसात लाखांचा निधीही मंजूर केलेला असतांना सदर रस्त्याचा प्रस्ताव वन विभागाकडून अहवाल प्राप्त न झाल्याने प्रलंबित आहे, असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदरहू प्रकरणी रस्त्याचे काम न झाल्याने आदिवासी ग्रामस्थांना व रुग्णांना डोलीतून न्यावे लागत असल्याने निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याबाबत वन विभागाकडून अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणार आहे,
(४) असल्यास, उक्त रस्त्याबाबत वन विभागाकडून अहवाल प्राप्त होण्याबाबत तसेच उक्त ठिकाणचा रस्ता होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०६-०६-२०२२) : (१) व (२) अशंत: खरे आहे.
(३) व (४) पनवेल तालुक्यातील कोरल हा रस्ता रस्ते विकास योजना सन २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र.१२२ दर्जाचा आहे. या रस्त्याची एकूण लांबी २.८० कि.मी एवढी असून अस्तित्वातील लांबी ०.७०० कि.मी. एवढी आहे. सदर रस्त्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ओटीएसपी) अंतर्गत रु.७.५० लक्ष एवढया किंमतींस प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरचा रस्ता हा वनक्षेत्रातून जात असल्याने वन विभागाची मंजूरी मिळणे आवश्यक आहे. उपवन संरक्षक अलिबाग यांच्याकडून दिनांक ०७.०१.२०२२ अन्वये सदर रस्त्यासाठी जागा उपलब्ध झाली असून रस्त्याचे काम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक (जि. नागपूर) येथील लघु पाटबंधारे
उपविभागातील अभियंत्यांचे पद रिक्त असल्याबाबत

(१२) ३८२९२ (११-०४-२०२२). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) येथील जिल्हा परिषद लघु पाटबंधारे उपविभागात रामटेक व पारशिवनी तालुक्यांचा समावेश असून येथील उपविभागीय जलसंधारण अधिकारी तसेच, कनिष्ठ अभियंता/जलसंधारण अधिकारी यांची ५ पदे मंजूर असून १ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून सर्वच पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागांतर्गत महामंडळ व जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विविध कामे मंजूर व प्रस्तावित असून स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत सदर दोन्ही पदे भरण्याबाबतची मागणी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०१-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
रामटेक येथील उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांची जिल्हा जलसंधारण अधिकारी पदावर पदोन्नती झाली आहे. यास्तव रामटेक येथील कामे सुरळीत पध्दतीने सुरु ठेवण्यासाठी उपविभाग रामटेक येथील अतिरिक्त कार्यभार उपविभागीय जलसंधारण अधिकारी, उपविभाग कुही यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसेच कनिष्ठ अभियंता/जलसंधारण अधिकारी संवर्गाची ५ पदे मंजूर असून १ पद सर्वसाधारण बदलीमध्ये भरण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) नजीकच्या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उपलब्ध होण्याऱ्या सरळसेवा अभियंत्यांमधून अथवा उपविभागीय जलसंधारण अधिकारी पदावरील पदोन्नतीची प्रक्रीया सुरु असल्याने त्यामधून उपलब्ध होणाऱ्या पदांमधून सदर पदे प्राथम्याने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अमरावती जिल्हा परिषद बांधकाम विभागाअंतर्गत होणारी कामे
शासन निर्णयानुसार झालेले नसल्याबाबत

(१३) ३८५७१ (०१-०४-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा परिषद बांधकाम विभागअंतर्गत लेखाशिर्ष ३०५४ व ५०५४ मधील कामांना मंजूरी देतांना शासन निर्णयातील प्राधान्यक्रमाने व PCI नुसार कामाची निवड करणे आवश्यक होते, मात्र त्याबाबत कुठलेही काम शासन निर्णयानुसार झालेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी अमरावती जिल्हापरिषद सदस्य यांनी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे तक्रार केली असता सन २०२०-२१ मधील १९ व सन २०२१-२२ मधील ३४ असे एकूण ५३ कामे रद्द करण्यात येत असल्याबाबत आदेश पारीत करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने या प्रकरणात दोषी असणाऱ्या कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण लेखाशिर्ष ३०५४-२०१६ अंतर्गत सन २०२०-२१ मधील १९ कामे व सन २०२१-२२ मधील ३४ कामे अशी एकूण ५३ कामे PCI प्राधान्यक्रमानुसार घेण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) व (३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे दि.१६.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर ५३ कामे रद्द करण्यात आली आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेने सदर ५३ कामाऐवजी PCI प्राधान्यक्रमानुसार अन्य ४८ कामांना मंजूरी दिली असून, सद्य:स्थितीत सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौ नारे (ता.वाडा,जि.पालघर) येथील सेंट गोबेन इंडिया प्रा.लि.या कंपनीतील
कंत्राटी कामगारांना पुन:श्च सेवेत घेण्याबाबत

(१४) ३८५८३ (०६-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नारे (ता.वाडा, जि.पालघर) येथील सेंट गोबेन इंडिया प्रा.लि.या कंपनीत गेल्या १५ वर्षापासून कंत्राटी कामगार म्हणून काम करणाऱ्या ४५ कामगारांना कंपनी प्रशासनाने कुठलीही पूर्वसूचना न देताच माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान सेवेतून बडतर्फ करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर एक वर्षानंतर ही कंपनी पूर्ववत झाल्यानंतर जुन्या सर्व कंत्राटी कामगारांना पुन्हा कामावर घेण्यास नकार देण्यात येऊन परप्रांतीय कामगारांची भरती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात कामगार संघटनांनी कंपनी व्यवस्थापनाकडे वारंवार विनंती केली असून तालुका तहसिलदार यांच्या दालनात कंपनी व्यवस्थापनाबरोबर चर्चा करुनही या कामगारांना पुन्हा कामावर घेण्यास कंपनी व्यवस्थापनाने विरोध केला आहे, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पुन्हा कामावर न घेतल्यास या कामगारांनी कंपनीच्या समोर आत्मदहन करण्याचा इशारा कामगार आयुक्त व तहसिलदार, वाडा यांना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यास पाठविलेल्या निवेदनातून देण्यात आला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौक्शी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने कंत्राटी कामगारांना पुन:श्च सेवेत घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१७-०६-२०२२) : (१) मे.सेंट गोबिन इंडिया प्रा.लि. या कंपनीत मे.प्रथमेश टेक्नोवर्क फोर्स प्रा.लि. या कंत्राटदारामार्फत काम करणा-या ४४ कामगारांनी कामगार उपआयुक्त, पालघर यांना दि.०९/१२/२०२१ रोजी निवेदन देऊन पुन्हा कामावर घेण्याची मागणी केली होती. परंतु सदर यादीतील ४४ कामगारांपैकी ४ कामगार दुबार असून, उर्वरित ४० कामगारांपैकी २८ कामगारांनी सन २०२० मध्ये राजीनामे दिले असून त्यांना कायेदशीर देणी अदा करण्यात आल्या आहेत. ११ कामगार इतर ठिकाणी कार्यरत असून, सध्या १ कामगार कंपनीमध्ये काम करीत असल्याची वस्तुस्थिती कामगार उपआयुक्त, पालघर यांचेकडील दिनांक १५/१२/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये व व्यवस्थापनाने दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

कंपनी व्यवस्थापनाने दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये परप्रांतीय कामगारांची भरती केली नसल्याचे लेखी कळविले आहे.

(३) कामगार उपआयुक्त, पालघर यांचेकडे दिनांक १५/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये काम उपलब्ध झाल्यानंतर आवश्यकतेनुसार जुन्या कंत्राटी कामगारांना प्राधान्याने कामावर घेण्यात येईल असे कंत्राटदाराने मान्य केले आहे.

(४) २० कंत्राटी कामगारांनी दिनांक २८/१२/२०२१ रोजी कामगार उपआयुक्त, पालघर तसेच तहसिलदार, वाडा यांना निवेदन देऊन दि.०५/०१/२०२१ रोजी आत्मदहन करणार असल्याचे कळविले होते. तथापि, सदर तारखेस कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही.

(५) कामगार उपआयुक्त, पालघर यांचेकडे दि. १३/१२/२०२१, १५/१२/२०२१, २८/१२/२०२१ व दि.०३/०१/२०२२ रोजी ४४ कामगारांच्या दि.०९/१२/२०२१ रोजीच्या तसेच श्री.पराग पाष्टे व इतर यांच्या दि.०२/०१/२०२२ रोजीच्या निवेदनांच्या अनुषंगाने उभयतांच्या बैठका संपन्न झाल्या. सदर निवेदनात नमूद ४४ कामगारांपैकी ४ कामगार दुबार असून, उर्वरित ४० कामगारांपैकी २८ कामगारांनी सन २०२० मध्ये राजीनामे दिले असून त्यांना कायेदशीर देणी अदा करण्यात आल्या आहेत. ११ कामगार इतर ठिकाणी कार्यरत असून, सध्या १ कामगार कंपनीमध्ये काम करीत असल्याची वस्तुस्थिती व्यवस्थापनाने दि.१५/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत निदर्शनात आणली. तसेच कामाच्या उपलब्धतेनुसार जुन्या कंत्राटी कामगारांना प्राधान्याने कामावर घेण्यात येईल असे कंत्राटदारांने मान्य केले आहे. याबाबत कंपनी व्यवस्थापनाने दिनांक १३/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कामगार उपआयुक्त, पालघर यांना कळविले आहे. तसेच कामगार उपआयुक्त, पालघर यांनी दि.२८/१२/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील तरतुदीनुसार औद्योगिक विवाद उपस्थित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

मौ भामरखेडा (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील पाझर तलावाच्या सर्व्हेक्षणाच्या कामाबाबत

(१५) ३८६६९ (०१-०४-२०२२). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भामरखेडा (ता.पारोळा, जि.जळगांव) येथील पाझर तलावाच्या लघु पाटबंधारे योजनेचे सर्व्हेक्षणाचे काम जलसंधारण विभागामार्फत सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाझर तलावाच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झाले किंवा कसे याबाबत शासनाने पहाणी केली आहे काय,
(३) असल्यास, पहाणीच्या अनुषंगाने काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त पाझर तलावाच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०२-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मौजे भामरखेडा येथील साठवण तलाव या योजनेच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे. त्यानुषंगाने सदर योजनेचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सक्षम स्तरावर मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) येथे समृद्ध किसान योजनेत विहीरींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(१६) ३८७०३ (११-०४-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभूर्णा (जि.चंद्रपूर) येथे समृध्द किसान योजनेतंर्गत शेतकऱ्यांच्या शेतात विहिरींचे बांधकाम कंत्राटदारांच्या माध्यमातून हाती घेण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी करोडो रुपये खर्च करण्यात येत असून विहीरींचे खोदकाम व बांधकाम निकृष्ट होत असल्याचे येथील लाभार्थी शेतकऱ्यांच्या तक्रारी दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन येथील कंत्राटदारांवर कारवाई करण्यासह विहिरींचे खोदकाम व बांधकाम दर्जेदर होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (१४-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

"चांदा ते बांदा" योजनेंतर्गत "समृध्द किसान योजना" ही चंद्रपूर जिल्हयामध्ये जलसंधारण विभाग व टाटा ट्रस्टच्या सहकार्याने "समृध्द शेतकरी समूह /सामूहिक उद्देश गट" स्थापन करुन त्यांचेमार्फत कोटेशन पध्दतीने कमी दरपत्रक असलेल्या नोंदणीकृत कंत्राटदारांची नेमणूक करुन राबविण्यात आली आहे.

(२), (३) व (४)

या योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या विहीरींचे बांधकामाबाबत पोंभुर्णा तालुक्यामध्ये दिनांक १०.८.२०२१ दरम्यान ३ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यासंदर्भात टाटा ट्रस्ट व जलसंधारण विभागामार्फत संबंधितांसोबत बैठक घेऊन तक्रारींचे समाधानकारक निराकरण करण्यात आले आहे. विहीरींना मुबलक प्रमाणात पाणी लागल्यामुळे शक्य होत असलेल्या पातळीपर्यंत R.C.C. STEINING चे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. बांधकामाचा गुणवत्ता व दर्जा चांगला असून सर्व विहिरी सुस्थितीत आहेत.

राज्यातील सर्व व्यावसायीक दुकाने व कंपन्यांच्या आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेमध्ये करण्याबाबत

(१७) ३८९४६ (१२-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व व्यावसायीक दुकाने व कंपन्यांच्या आस्थापनांचे नामफलक मोठे तसेच

मराठी भाषेमध्ये असावेत असा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे काय तसेच इतर भाषेतील नावापेक्षा मराठी भाषेचे नामफलक मोठे असावे याबाबतची कार्यवाही सुरु झाली आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या निर्णयानुसार ज्या दुकानांची तसेच कंपन्याच्या आस्थापनांचे नामफलक मोठे व मराठी भाषेत करण्यात येणार नाहीत अशा संबंधीतांवर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, याबाबतच्या कार्यप्रणालीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शाासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुसार उक्त ठिकाणांचे मराठीभाषेत नामफलक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१७-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
राज्यातील सर्व आस्थापनांचे नामफलक मराठी देवनागरी लिपित तसेच सुरुवातीस दर्शविण्याबाबत तसेच मराठी अक्षराचा टंकआकार इतर भाषेतील टंकआकारापेक्षा लहान असणार नाही अशी सुधारणा महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२२ अन्वये दिनांक १७/०३/२०२२ रोजी करण्यात आली आहे.
(२) होय.
(३) उपरोक्त नमूद सुधारणा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास निरिक्षण शेरे पारीत करण्यात येतात व आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करणेबाबत संबंधित आस्थापनेस ०७ दिवसांची मुदत देण्यात येते. विहित मुदतीत त्रुटींची पुर्तता न केल्यास, महाराष्ट्र दुकान व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ च्या कलम २९ मधील तरतुदीनुसार संबंधित आस्थापनेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.
(४) महाराष्ट्र दुकान व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन)(सुधारणा) अधिनियम, २०२२ अन्वये दिनांक १७/०३/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सुधारणेच्या अंमलबजावणीसाठी कामगार आयुक्त, मुंबई यांनी दि.२६/०४/२०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार दि.२७/०४/२०२२ ते ०६/०५/२०२२ या कालावधीत अधिसुचना प्रसिध्द करुन जनजागृती करण्याकरीता आस्थापनांना भेटी देण्याबाबत सुविधाकारांना सुट देण्यात आली होती. सदर कालावधीत मराठी नामफलक नसणाऱ्या किंवा लहान अक्षरात नामफलक असणाऱ्या एकूण ३७३९ आस्थापनांना भेटी देण्यात आल्या असून त्यांना नामफलक मराठी भाषेत प्रदर्शित करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर व बोदवड पंचायत समित्यामध्ये नियमित लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत

(१८) ३९०३२ (०१-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर व बोदवड (जि. जळगाव) येथील पंचायत समित्यामध्ये नियमित लेखापरिक्षण अहवाल सन २०१८-१९ मध्ये नमूद लेखा आक्षेपाबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करुन त्याप्रमाणे अहवाल सादर करण्याच्या सूचना संबधित पंचायत समितीना माहे डिसेंबर, २०२१ शेवटच्या आठवडयात वा त्यादरम्यानच्या शासनाकडून देण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी सूचनेप्रमाणे अहवाल सादर करण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त अहवालनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१५-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

जळगाव जिल्हयातील मुक्ताईनगर व बोदवड पंचायत समित्यांमध्ये लेखा परीक्षण अहवालातील गंभीर स्वरुपाचे आर्थिक आक्षेपाबाबत तक्रार प्राप्त असून, त्याअनुषंगाने उपायुक्त (विकास),विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग यांचेकडे जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडून दि.२२/०६/२०२१ रोजी अहवाल सादर करण्यात आला आहे. वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.३०/०५/२०१७ मधील परिच्छेद ३ येथील निर्देशानुसार जळगाव जिल्हा परिषदेकडून विशेष लेखा परीक्षणाची मागणी करण्यात आलेली नाही. नियमित लेखा परीक्षण अहवाल सन २०१८-१९ मध्ये नमूद लेखा आक्षेपाबाबत उचित कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करण्याच्या सूचना मुक्ताईनगर व बोदवड या दोन्ही पंचायत समित्यांना देण्यात आलेले आहेत.

(२) होय. अहवाल सादर करण्यात आला आहे.

(३) लेखापरीक्षण अहवालावर अनुपालन अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा येथील वांगना प्रकल्पाचे तांत्रिक डिझाईन चुकीच्या पध्दतीने केल्याबाबत

(१९) ३९६०५ (०७-०४-२०२२). श्री.महेश शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील वांगना प्रकल्पाचे तांत्रिक डिझाईन कंपनीने चुकीच्या पध्दतीने केल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चुकीच्या पध्दतीचे डिझाईन करणाऱ्या अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही. वांगणा प्रकल्प व इतर घटकांच्या संकल्पनास मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून मुल्यार्पन करुन घेण्यात आलेले आहे. तसेच, सर्व आवश्यक तांत्रिक मंजुरी सक्षम स्तरावरुन प्राप्त करुन घेण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

बोन्डारवाडी (ता.जावळी, जि.सातारा) येथील धरण प्रकल्प उभारणीचे काम पूर्ण करण्याबाबत

(२०) ३९६०८ (०७-०४-२०२२). श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोन्डारवाडी (ता.जावळी, जि.सातारा) येथील बोन्डारवाडी धरण प्रकल्प उभारणीचे कामास मंजूरी देण्यात येवूनही प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जावळी तालुक्यातील ५४ गावांतील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याकरीता धरण प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक असून सदर प्रकल्पाचे काम सुरु करण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोन्डारवाडी धरण प्रकल्पाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१६-०६-२०२२) : (१) नाही.
(२) होय.
(३) प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे प्राथमिक सर्वेक्षणाचे तसेच विंधन विवरे घेण्याचे काम पूर्ण करता आले नाही. शासनाच्या वतीने जिल्हाधिकारी,सातारा,जलसंपदा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व ग्रामीण पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,सातारा यांनी वारंवार बैठका घेऊन प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी समजून घेतल्या आहेत. तथापि, प्रकल्पगस्तांच्या समस्यांचे निराकरण होऊ शकलेले नाही.
(४) प्रकल्पग्रस्तांच्या तीव्र विरोध यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकलेले नाही.

सातारा जिल्ह्यातील आरोग्य केंद्रातील वैद्‌यकीय अधिकारी व इतर रिक्त पदांसंदर्भात...

(२१) ३९६१४ (१३-०४-२०२२). श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (सातारा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंदे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालयात वैद्‌यकीय अधिकारी, नर्स व इतर पदे रिक्त असून केंद्र, रुग्णालय निहाय रिक्त पदे कोणती व त्यांची संख्या किती आहे,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंदे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरणे आवश्यक असताना सदर पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंदे, उपकेंद्रे व ग्रामीण रुग्णालयात असलेल्या रिक्त पदांमुळे वैद्यकीय मनुष्यबळ अपुरे पडत असून त्यामुळे कोरोना काळात रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१७-०६-२०२२) : (१) सातारा जिल्हा परिषद आरोग्य विभागांतर्गत ८४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ४१५ उपकेंद्रे कार्यान्वित आहेत. सदर प्रा. आ. केंद्रे/ उपकेंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी यांची १८७ पदे मंजूर असून १३४ स्थायी पदे, ४ बंधपत्रित व ३९ कंत्राटी पदे भरलेली असून १० पदे रिक्त आहेत. तसेच आरोग्य सेवक पुरुष ५०९ पदे मंजूर असून १९४ पदे भरलेली व ३१५ पदे रिक्त आहेत. आरोग्य सेवक महिला ७२३ पदे मंजूर असून ३०३ पदे भरलेली व ४२० पदे रिक्त आहेत. आरोग्य सहायक पुरुष १४६ पदे मंजूर असून ११६ पदे भरलेली (१२ पदे बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने भरलेली आहेत. व ३० पदे रिक्त आहेत. आरोग्य सहायक महिला ११८ पदे मंजूर असून ९१ पदे भरलेली व २७ पदे रिक्त आहेत. आरोग्य पर्यवेक्षक २४ पदे मंजूर असून १९ पदे भरलेली व ०५ पदे रिक्त आहेत. औषध निर्माण अधिकारी ११४ पदे मंजूर असून ८१ पदे भरलेली (१२ बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने भरलेली आहेत) व ३३ पदे रिक्त आहेत. प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०७ पदे मंजूर असून ०२ पदे भरलेली आहेत व ५ पदे रिक्त आहेत. कुष्ठरोग तंत्रज्ञ ३ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली आहेत.

जिल्हा रुग्णालय, सातारा अंतर्गत असलेल्या ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक यांची १४ पदे मंजूर असून ५ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट अ (एस २०) यांची ४५ पदे मंजूर असून ३६ पदे भरलेली व ९ पदे रिक्त आहेत. अधिपरीचारीका यांची ८७ पदे मंजूर असून ६२ पदे भरलेली असून २५ पदे रिक्त आहेत.
(२) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

खरसुंडी ते करगणी (ता.आटपाडी, जि.सांगली) येथील इजिमा १५४ या रस्त्याची दुरावस्था झाल्याबाबत

(२२) ४०११३ (०१-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरसुंडी ते करगणी (ता. आटपाडी, जि. सांगली) येथील इजिमा १५४ या रस्त्याची

दुरावस्था झाली असून सदर ठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्ता मागील अनेक वर्षापासून दुरुस्त केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने रस्त्याची दुरुस्ती त्वरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१६-०६-२०२२) : (१) व (२) अशंत: खरे आहे.
(३) रस्ते विकास आरखडा सन २००१-२१ नुसार खरसुंडी बाळेवाडी रस्ता हा इजिमा क्र.१५४ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी १२.०० कि.मी. एवढी आहे.सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये झालेली अतिवृष्टीमुळे आणि रस्त्यावरील वाहतुक वर्दळीमुळे सदरच्या एकुण रस्त्यापैकी सा.क्र.१/५०० ते ७/०० व ९/०० ते १२/०० मधील डांबरी रस्त्याचा पृष्ठभाग नादुरुस्त झालेला आहे. सदर रस्त्यावर रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम गट अ अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये रु.३.०० लक्ष आणि रिलायन्स जिओ रस्ते खुदाई नुकसान भरपाई अनुदान रु.८.३५ लक्ष चे खड्डे भरण्याचे काम मंजूर असून प्रगतीत आहे.तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर रस्त्यासाठी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात रु.५०.०० लक्ष निधी मंजूर झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

खानापूर (जि. सांगली) तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्याची दुरावस्था झाल्याबाबत

(२३) ४०११५ (२९-०३-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि. सांगली) तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद अंतर्गत रस्त्याची दुरावस्था झाली असून निधी अभावी सदर रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू रस्ते दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०६-२०२२) : (१) ग्रामीण भागातील काही रस्ते खानापूर तालुक्यातील नादुरुस्त आहेत. हे खरे आहे. तथापि, मंजूर असलेली कामे निधी अभावी अपूर्ण नाहीत.
(२) रस्ते विकास आराखडा सन २००१ ते २१ अंतर्गत सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्याअंतर्गत इजिमाची लांबी ९६.९६ कि.मी. व ग्रामीण मार्गाची लांबी ३९९.५९ किमी. अशी एकूण ४९६.५५ कि.मी. एवढी आहे.

रस्ते व पुल दुरुस्ती अंतर्गत सदर तालुक्यासाठी सन २०१९-२० मध्ये रु.१२९.०० लक्ष निधी मंजूर असून १ काम वगळता सर्व कामे पूर्ण झाली आहेत. जिल्हा वार्षिक योजना २०२०-२१ अंतर्गत रु.२५४.०० लक्षची कामे मंजूर असून काही कामे पूर्ण झालेली आहेत. तर काही कामे प्रगतीत आहेत. तसेच जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२ अंतर्गत रु.३४७ लक्ष किंमतीच्या कामांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. जिल्हा परिषदे द्वारे निधीच्या उपलब्धतेनुसार सदर तालुक्यातील रस्ते सुस्थितीत ठेवण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील तलावांवर पक्षी अभ्यासकांनी केलेल्या निरीक्षणाबाबत

(२४) ४०१६३ (१३-०४-२०२२). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात पक्षी अभ्यासकांनी जिल्हातील तलावांवर केलेल्या निरीक्षणानुसार केवळ नागपूर जिल्ह्यात दरवर्षी तलावाजवळ असलेल्या जाळ्यात अडकून हजारो पक्ष्यांचा जीव जातो यामध्ये परदेशी पक्षांच्या समावेश अधिक असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नागपूर जिल्ह्यात २५० च्या वर तलाव असून सदर तलावांचे नियंत्रण पाटबंधारे आणि जिल्हा प्रशासनाकडे असल्याने वनविभागास याबाबत हस्तक्षेप करता येत नसल्याने तलावाच्या काठावर जाळे पडून राहणार नाही या अटीवर मासेमारीला परवानगी द्यायला हवी तसेच सदरहू तलावांची नियमित स्वछताही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिवाळ्याचा काळ हा पक्ष्यांसाठी महत्वाचा असून बहुतेक प्रजातीचा पक्षांचा हा प्रजननाचा काळ असतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून पाहणी करण्यात आली आहे काय, पाहणीत काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त पक्षांचा जीव वाचवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१६-०६-२०२२) : (१) जलसंपदा विभागाअंतर्गत असलेल्या क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत नागपूर जिल्ह्यात २ मोठे, १२ मध्यम व ६० लघु पाटबंधारे असे एकूण ७४ प्रकल्पांचे एकूण ७७ जलाशये आहेत. या जलाशयांजवळ असलेल्या जाळयात अडकून पक्षांचा जीव जातो, असे निदर्शनास आलेले नाही.
(२) मासेमारीकरीता जलसंपदा विभागातर्फे सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना जलाशय उपलब्ध करून देण्यात येतात. मासेमारी संबंधीच्या अटी व शर्ती या मत्स्योद्योग विकास महामंडळाकडून निश्चित करण्यात येतात.
(३) पक्षी अभ्यास व पक्षांच्या प्रजातीच्या प्रजनन काळाबाबतचा अभ्यास ही बाब जलसंपदा विभागाशी संबंधित नाही. तथापि तलावांच्या काठावर जाळे पडून राहणार नाही या अटीचा समावेश करण्याबाबत मत्स्य विभागास जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांनी कळवले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

लाखेगाव (ता.पैठण,जि.औरंगाबाद) येथील रस्त्यावर अतिक्रमण केल्याने अपघात होत असल्याबाबत

(२५) ४०३५८ (०७-०४-२०२२). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखेगाव (ता.पैठण, जि.औरंगाबाद) परिसरातील जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत लाखेगाव ते कारकिन ग्रामीन मार्ग क्र. १५ हया रस्त्यावर नागरीकांनी अतिक्रमण केल्याने रस्ता अरूंद झाला असल्याने रस्त्यावर वाहन चालविण्यास नारीकांना त्रास होतो असून परिणामी अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाखेगाव ते कारकीन रस्त्यावर संबंधीत विभागाने अनेक वर्षापासून कोणतेही काम केले नसल्याने रस्ता पुर्णपणे उखडला असून जागोजागी खडे पडलेले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त रस्त्यावरील अतिक्रमणे काढून रस्त्याच्या डांबरी करणाचे काम त्वरीत करणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०६-२०२२) : (१) सदर ग्रामीण मार्ग क्र.१५ अतिक्रमणामुळे काही भागात अरुंद झाला आहे हे खरे आहे.
(२) व (३) लाखेगाव ते कारकीन रस्ता ग्रामा.१५ दर्जाचा असून त्याची लांबी ८.०० किमी एवढी आहे. सदर लांबी पैकी ४.६०० कि.मी. रस्त्याचे डांबरीकरण झालेले आहे. तर उर्वरीत ३.४०० कि.मी. रस्त्याचे खडीकरण व मजबूतीकरण झालेले आहे. सदर लांबीतील डांबरीकरण बाकी असून या लांबीमध्ये खड्डे पडलेले आहेत. सदर नादुरुस्त असलेल्या रस्त्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पुर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

तसेच सदर रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आलेल्या इसमांना जिल्हा परिषदेद्वारे नोटीसा देण्यात आल्या असून अतिक्रमण काढण्याची पुढील कार्यवाही जिल्हा परिषदेने सुरु केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जिल्हा परिषद शाळामधील केंद्रप्रमुखांची रिक्त पदे भरणेबाबत

(२६) ४०४८३ (०७-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषद शाळामधील रिक्त असणारी केंद्र प्रमुखाची ४०, ३०, ३० च्या पदांबाबत सन २०१८ ची अधिसूचना रद्द करून ५० टक्के सेवाज्येष्ठता मधून ५० टक्के कार्य शिक्षकांतून स्पर्धा परिक्षेमधून भरण्यात यावीत अशी या अधिसुचनेत दुरुस्ती करण्याची मागणी शिक्षकांमधून होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. हसन मुश्रीफ (०८-०६-२०२२) :(१), (२) व (३) दिनांक १०.६.२०१४ च्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार केंद्रप्रमुख संवर्गातील नियुक्तीकरिता सरळसेवा, विभागीय स्पर्धा परिक्षा व पदोन्नती यासाठी ४०:३०:३० असे गुणोत्तर शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दि. २.२.२०१० रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार निश्चित करण्यात आले आहे. केंद्रप्रमुखांच्या भरतीच्या गुणोत्तरामध्ये बदल करण्याबाबत संघटनांकडून मागणी होत आहे. त्यामुळे केंद्रप्रमुखांच्या सरळसेवा व विभागीय स्पर्धा परिक्षेद्वारा करावयाच्या नियुक्तीसंदर्भात शालेय शिक्षण व क्रिडा विभागासमवेत विचार विनिमय करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

शहादा (जि.नंदुरबार) तालुक्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत निर्माणाधिन मलगांव-घोटाळी ते सरीपाणी रस्त्याच्या झालेल्या निकृष्ट कामाबाबत.

(२७) ४०५०० (०१-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहादा (जि.नंदुरबार) तालुक्यामध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत निर्माणाधिन मलगांव-घोटाळी ते सरीपाणी रस्त्याचे काम बऱ्याच दिवसांपासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदरहू रस्त्याचे अद्याप जे काम झाले आहे, ते निकृष्ट दर्जाचे आहे याबाबतीत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत व निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सदर रस्त्याच्या दर्जोन्नतीच्या कामावर सा.क्र.३/५१० वरील पाईप मोरी ही अंदाजपत्रक तयार करतेवळी होती. सदर रस्त्याच्या दर्जोन्नतीचे काम पुर्ण झाल्यानंतर पावसाळ्यात दिनांक १४ सप्टेंबर, २०२१ रोजी सदर सा.क्र.वरील पाईप मोरी खराब झाल्याने नव्याने २ मी. ची ढापा ड्रेन मक्तेदाराने स्वखर्चातून बांधून दिली असून सदर रस्ता वाहतूकीस सुरळीत आहे. तसेच सदर रस्त्याच्या कामावर विविध स्तरावर राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून नियतकालिक तपासण्या झाल्या असून तपासणीअंती समाधानकारक शेरे प्राप्त आहेत.

भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(२८) ४०५३३ (०७-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील दुगाडफाटा, दाभाड, शिरोले, पाच्छापुर हा रस्ता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ता सुधारायचे काम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर कामाची फेरतपासणी राज्य दक्षता व नियंत्रण पकथकाकडून करावी अशा मागणीचे अधीक्षक अभियंता, कोकण विभाग, ठाणे यांना दिनांक ११ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारस ईमेलद्वारे पत्रव्यवहार केला आहे, हे ह खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाच्या कामाची फेरतापसणी राज्य गुणवत्ता पथकाने करुन दोषींवर कोणती कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (संशोधन व विकास) अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील दुगाडफाटा शिरोळ ते पाच्छापूर रस्ता, ता.भिवंडी या रस्त्याचे काम पुर्ण झालेले असून सदर रस्त्यावर विविध स्तरावर राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून तपासणी झाली असून तपासणीअंती समाधानकारक शेरे प्राप्त आहेत. सद्यस्थितीत सदर रस्ता सुस्थितीत असून वाहतुक सुरळीतपणे चालू आहे.

गडचिरोली येथे नविन जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत.

(२९) ४०५४१ (०५-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा जलसंधारण कार्यालयाअभावी मृद व जलसंधारणाची कामे पुर्ण करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक ०१ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार गडचिरोली येथे नविन जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत आरमोरी, (जि.गडचिरोली) येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जलसंधारण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने गडचिरोली येथे नविन जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०१-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) या विभागाच्या दि.२७.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील गडचिरोली येथे निर्माण करण्यात आलेले नवीन जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालय दि.०१.०५.२०२२ पासून कार्यान्वित करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

चिखली (जि. बुलढाणा) येथे वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्प मध्ये पैनगंगा नदी जोड प्रकल्पाचा समावेश करणेबाबत

(३०) ४०६९६ (०५-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि. बुलढाणा) येथे वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्प शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्ह्यातील घाटाखालील भागासोबतच घाटावरील दुष्काळग्रस्त भाग असलेल्या भागाला ही याचा फायदा होण्यासाठी वैनगंगा नळगंगा प्रकल्पामध्ये पैनगंगा नदी जोड प्रकल्पाचा समावेश करून कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ जुलै, २०१९ व १२ जुलै २०२१ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त वैनगंगा नळगंगा प्रकल्पामध्ये पैनगंगा नदी जोड प्रकल्पाचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (०७-०६-२०२२) : (१) होय,

(२) होय,

(३) सदर मागणीच्या अनुषंगाने वैनगंगा-नळगंगा प्रकल्पामध्ये पैनगंगा नदीजोड प्रकल्पाचा समावेश करण्याबाबत क्षेत्रीय पाहणी केली असून प्राथमिक अभ्यास अहवाल तयार करण्यात येत आहे. वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पामध्ये पैनगंगा नदीजोड प्रकल्पाचा समावेश करण्यासाठी १४८.७० दलघमी अतिरिक्त पाणी लागणार आहे. पाणी उपलब्धतेबाबत जलशास्त्रीय अभ्यास प्रगतीत आहे.

वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास प्राधीकरण, हैद्राबाद यांनी तयार केला असुन सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेस्तव छाननीस आहे. प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त मागणीची तांत्रिक, आर्थिक व्यवहार्यता व इतर बाबी तपासल्यानंतर सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावात त्याचा समावेश करणेबाबत कार्यवाही करणे योग्य राहील.

(४) प्रश्न उदभवत नाही.

मलकापूर (जि. बुलढाणा) तालुक्यातील येथील कालव्यातील देखभाल दुरुस्तीची कामे आठ दिवसात पूर्ण केल्याबाबत

(३१) ४०७५७ (०५-०४-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि. बुलढाणा) तालुक्यातील नळगंगा प्रकल्प कालव्यातील देखभाल दुरुस्तीची निविदा प्रक्रिया ६ डिसेंबर २०२१ रोजी प्रसिध्द होऊन २२ डिसेंबर, २०२१ रोजी निविदा उघडण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा अंतर्गत २७ डिसेंबर २०२१ ते २३ जानेवारी २०२२ पर्यंत देखभाल दुरुस्तीची कामे केल्याचे दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्अनुषंगान उक्त कालव्यातील तांत्रिक दृष्ट्या देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी तीन महिन्यांचा कालावधी लागत असताना सदर कामे केवळ आठ दिवसात पूर्ण करणाऱ्या संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (०९-०६-२०२२) : (१) होय,

(२) हे खरे नाही.

सदर कामाच्या निविदेचा कार्यारंभ आदेश संबंधित अभिकरणास २७ डिसेंबर, २०२१ रोजी देण्यात आला. तसेच निविदेअंतर्गत अंतर्भूत असलेल्या कामांपैकी रब्बी हंगाम २०२१-२२ चे सिंचन करण्यासाठी आवश्यक असलेली कालवा देखभाल दुरूस्तीची कामेच युद्ध पातळीवर करून घेतली आहेत व निविदेमध्ये अंतर्भुत असलेली इतर कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच

एकूण रू.३७.३९ लक्षचे कामांपैकी दि.२३.१.२०२२ पर्यंत रू.१८.३८ लक्षचे काम केलेले असुन रू.१९.०१ लक्षचे काम शिल्लक असुन, प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात भंडारा जिल्ह्यातील तलावांच्या जागावर अतिक्रमण झाले असल्याने मासेमारी संस्थाच्या उत्पन्नात झालेली घट

(३२) ४०८४१ (११-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील सर्व १२ हजार १९६ तलावांच्या ५० ते ६० जागांवर अतिक्रमण झाल्याने मासेमारी संस्थाच्या उत्पन्नात ६० टक्के घट झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा हा जिल्हा तलावांचा जिल्हा असून यात जिल्हा परिषद व लघूपाटबंधारे विभागाच्या हजारो तलावांच्या माध्यमातून मासेमारी करणाऱ्या अनेक संस्था कडून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असतानाही याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर तलावांचे झालेले अतिक्रण निष्कासीत करुन पुर्वीप्रमाणे मासेमारी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१६-०६-२०२२) : (१) अशत: खरे आहे.
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांचे अधिनस्त भंडारा जिल्हयात ३१ लघु प्रकल्प व २८ मामा तलाव असे ५९ तलाव असून त्यापैकी २ सिंचन प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रात अतिक्रमण झाले असल्याचे आढळून आले आहे.
अ) परसवाडा लघु प्रकल्प ता.तुमसर, जि.भंडारा या प्रकल्पाचे बुडीत क्षेत्र २८.३४ हे. इतके आहे. सद्यस्थितीत ८.५ ते १० हे. तलावाच्या बुडीत क्षेत्रात शेती करून अतिक्रमण करण्यात आले आहे.
आ) सानगडी मा.मा.तलाव, ता.साकोली, जि.भंडारा या तलावाचे एकूण बुडीत क्षेत्र ४६.३५ हे. असून अंदाजे ६ ते ७ हेक्टर तलावाच्या बुडीत क्षेत्रात शेती करून अतिक्रमण करण्यात आले आहे.
उपरोक्त अतिक्रमण बुडीत क्षेत्राच्या सिमावर्ती भागात असल्यने तलावातील मासेमारीत घट झालेली नाही.
(२) हे खरे नाही.
सदर प्रकरणी अतिक्रमण काढण्याबाबत महामंडळांतर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांनी संबंधितांना नोटीसाव्दारे कळविण्यात आले आहे.
(३) सदर प्रकरणी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयामार्फत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा व जिल्हयांतर्गत बदल्यासंदर्भातील धोरण जाहिर करण्याबाबत

(३३) ४०९८६ (०१-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हयांतर्गत/आंतरजिल्हा बदल्यासंदर्भात धोरण निश्चित करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अभ्यास गटाने आपला अहवाल दिनांक १८ मार्च, २०२० रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालावर निर्णय घेऊन शासनाने सदरील धोरण निश्चित केले आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हयांतर्गत/आंतरजिल्हा बदल्यासंदर्भात धोरण जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०८-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय

(३) जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्या हया ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत दिनांक ७.४.२०२१ च्या शासन निर्णय अन्वये सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

भोर व वेल्हे (जि.पुणे) तालुक्यातील तीन उपसा सिंचन योजनांना मंजूरी देण्याबाबत.

(३४) ४११६४ (११-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील मौजे खामगांव, रांजणे, कोंडगांव, आंबेड, ओसाडे, निगडे (ता.वेल्हे), मौजे कर्नावड, (ता.भोर) व मौजे टिटेघर, वडतुंबी, कोर्ले, म्हाकोशी (ता.भोर) या तीनही योजना डोंगराळ भागात असून शेतीच्या पाण्यापासून वंचित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तीन योजना ६०० हेक्टरच्या आत आहेत व या योजना झाल्यास शेतीच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार असून या भागातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनांच्या माध्यमातून बागायत शेती करुन शेती उत्पादनात वाढ करण्याकरीता या योजनांचे सर्वेक्षण करुन सदर योजना तातडीने मंजूर करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त योजनेस निधीची तरतूद तसेच सदरहू योजनांना तात्काळ मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०६-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, सविस्तर सर्वेक्षणांती क्षेत्र निश्चित होईल.
(३) मौजे कर्नावड, टिटेघर, वडतुंबी, कोर्ले, म्हाकोशी (ता.भोर) या योजना धोम बलकवाडी विभागामार्फत प्रगतीपथावर आहे व मौजे खामगाव, रांजणे, कौडगाव, आंबडे, निगडे (ता.वेल्हे) या योजनांसाठी मा.विधानसभा सदस्य यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रीय पाहणी करण्यात आलेली आहे.
(४) सदर योजनांचे सविस्तर सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मध्य गोदावरी उपखऱ्तील प्रकल्पाचे पुर्वनियोजन प्रस्तावाबाबत

(३५) ४१३०२ (०१-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मध्य गोदावरी उपखोऱ्यातील प्रकल्पाचे पुर्वनियोजन प्रस्ताव कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ६ मे,२०२० रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये महासंचालक, मेरी नाशिक यांचेकडे प्रमाणित करणेसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावानुसार मध्य गोदावरी खोऱ्यात वापरानुसार २८ अ.घ.फू (टीएमसी) पाणी शिल्लक असल्याचे संचालक, मेरी नाशिक यांनी माहे फेब्रुवारी, २०२१ च्या पत्रान्वये प्रमाणित करुन प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी एकात्मिक राज्य जल आराखड्यानुसार मराठवाड्यात पाणी वितरण करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
श्री. जयंत पाटील (०७-०६-२०२२) : (१) होय, खरे आहे.
मध्य गोदावरी उपखोऱ्यातील प्रकल्पांचे पुनर्नियोजन प्रस्ताव कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दि. ०६/०५/२०२० रोजी महासंचालक, मेरी नाशिक यांचेकडे सादर केला आहे.
(२) नाही.
सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महासंचालक, मेरी, नाशिक यांनी त्यांचे दि. ०२/०२/२०२१ च्या पत्रान्वये "तुर्त कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी लवादाच्या Consumptive पाणी वापर परिगणणेनुसार मध्य गोदावरी खो-यात २.८ अ.घ.फू. पाणी शिल्लक असल्याचा प्रस्ताव दिला आहे व तो प्रथमदर्शनी बरोबर वाटतो असा अभिप्राय मुख्य अभिंयता, जलविज्ञान व धरण सुरक्षितता, नाशिक यांनी कळविलेप्रमाणे प्रमाणित करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही मान्यता शासन स्तरावरून देण्यास शिफारस आहे". असे कळविले आहे.

(३) महासंचालक, मेरी, नाशिक यांनी प्रमाणित केल्यानुसार मध्य गोदावरी खो-यात एकात्मिक राज्य जल आराखडयातील खंड II A मधील प्रकल्प यादीतील पाणी वापरास लवादातील Consumptive पाणी वापर सुत्रानुसार परिगणित केल्यास उपलब्ध होणा-या २.८ अ.घ.फू. पाणी वापराचे पुढील नियोजन लवादाच्या तरतुदीच्या व काही अटीच्या अधीन राहून करण्यास शासन पत्र दि. ०९/०६/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली. तथापि, तदनंतर, शासन पत्र दि. १४/१०/२०२१ अन्वये गोदावरी पाणी तंटा लवादानुसार मध्य गोदावरी खो-यातील अनुज्ञेय पाणी परिगणित करताना दि. ६/१०/१९७५ पूर्वीच्या मंजूर प्रकल्पांचा एकूण पाणी वापर निश्चित करताना माजलगांव प्रकल्पास दि. २१/५/१९७४ ची मूळ प्रशासकीय मान्यता असताना सुध्दा चुकीने सदर प्रकल्प दि. ०६/१०/१९७५ नंतरच्या नवीन प्रकल्प गृहित धरल्यामुळे पूर्वी परिगणित केलेल्या मध्य गोदावरी खो-यासाठी १०२ अ.घ.फू. अनुज्ञेय पाणी वापर नव्याने परिगणित करून माजलगांव प्रकल्पाचे मंजूर पाणी वापर १९.२९ अघफू असल्याने पूर्वी परिगणित ४२ + ६०=१०२ अघफू पाणी वापराऐवजी दुरूस्तीनुसार सुधारित ६१.२९ + ६०= १२१.२९ अघफू अनुज्ञेय पाणी वापरास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मध्य गोदावरी खो-यात सद्यस्थितीनुसार १४.१५ अघफू पाणी शिल्लक येते. शासनाचे दि. ९/६/२०२१ चे पत्रान्वये यापूर्वी Consumptive पाणी वापरानुसार मध्य गोदावरी खो-यात मंजूर केलेले २.८० अघफू पाणी उपरोक्त १४.१५ अघफू पाण्यामध्ये समाविष्ट आहे. सदर शिल्लक पाण्यातून हाती घ्यावयाच्या प्रकल्पांबाबतची कार्यवाही महामंडळ स्तरावर प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

दानापूर (अकोट, जि.अकोला) येथील वाण धरण पाटबंधारे विभागाअंतर्गत असलेले मायनर व पाटचारी पूर्ववत करण्याबाबत

(३६) ४१४६२ (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दानापूर (अकोट, जि.अकोला) येथील वाण धरणावरुन पाटबंधारे विभागाने कालव्यांची निर्मिती करुन चांगलवाडी शेतशिवारात अनेक ठिकाणी मायनर व पाटचाऱ्यांचे सपाटीकरण केल्याने शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटबंधारे विभागाने चांगलवाडी शेतशिवारात नकाशाप्रमाणे सर्वेक्षण करुन बंद करण्यात आलेल्या मायनर व पाटचारी पूर्ववत करुन देण्याबाबत शेतकऱ्यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्‌नुसार मागणीच्या अनुषंगाने मायनर व पाटचारी पूर्ववत करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१६-०६-२०२२) : (१) हे खरे नाही,

सद्य:स्थितीत वाण प्रकल्पाअंतर्गत दानापुर शाखा कालव्यावरून निघणारे लघु कालवा क्र.०३ व लघु कालवा क्र.०६ चांगलवाडी शिवारामध्ये आहेत. सदर लघु कालव्यांवर प्रकल्प पूर्ण झाल्यापासुन सिंचनासाठी अत्यल्प पाणी मागणी प्राप्त झालेली आहे. सद्य:स्थितीत दोन्ही मायनरचे सपाटीकरण करण्यात आलेले नाही. लघु कालव्यावर असलेल्या पाटचा-यांची देखभाल दुरूस्ती ही शेतक-यांनी करणे अपेक्षीत असुन या सर्व पाटचा-यांवर सन २०१२-१३ पासुन सिंचन मागणी नसल्याने व अत्यल्प सिंचन झालेले असल्याने शेतक-यांनी पाटचा-यांचे सपाटीकरण केलेले आहेत. तसेच लघु कालवा क्र.०३ वर चांगलवाडी शिवारामध्ये रब्बी हंगाम सन २०२०-२१ मध्ये १३.७९ हे. सिंचन झालेले आहे. सन २०२१-२२ मध्ये लघु कालवा क्र.०३ वर कुठल्याही प्रकारची पाणी मागणी झालेली नाही.

(२) होय हे खरे आहे.

तथापि पाटचा-यांवरील देखभाल व दुरूस्तीची कामे शेतक-यांनी करणे अपेक्षीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोना लस न घेता ही त्याचे बनावट प्रमाणपत्र मिळत असल्याबाबत.

(३७) ४१७९८ (२४-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना प्रादूर्भाव रोखणे तसेच यावर नियंत्रण आणण्यासाठी देण्यात येणाऱ्या लसीच्या दोन मात्रा घेतल्यावर कोविन ॲपवरून त्यासंदर्भातले प्रमाणपत्र देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लस न घेतादेखील लोकांना प्रमाणपत्र मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनमार्फत होत असलेल्या कार्यवाहीवर लसी संदर्भात बनावट प्रमाणपत्राची विक्री करण्या-या लोकाकडून जनतेची फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

कोविड १९ लसीकरणाच्या मात्रा घेतल्यानंतर लाभार्थ्यांना कोविन ॲपवरुन प्रमाणपत्र देण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) धुळे महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. १४ ऑक्टोबर ते दि. ६ डिसेंबर २०२१ या कालावधीमध्ये ३१९१ लोकांना लसीकरण झालेले नसताना लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी धुळे शहर पोलिस स्टेशनमध्ये दि. ८ जानेवारी २०२२ रोजी गुन्ह्याची नोंद झाली असून प्रभारी वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून इतर ३ व्यक्तींच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. २८ ऑगस्ट २०२१ रोजी १६ नागरीकांचे लसीकरण झालेले नसताना प्रमाणपत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी पोलिस ठाणे बेगमपुरा येथे दि.१ सप्टेंबर २०२१ रोजी गुन्हा दाखल झाला असून पोलिस तपास चालू आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र, शिवूर, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद येथे लसीकरण झालेले नसताना प्रमाणपत्र देण्यात आल्याचे निदर्शनास आले. जिन्सी पोलिस स्टेशन औरंगाबाद येथे दि. १५ डिसेंबर २०२१ रोजी गुन्हा नोंद झाला असून पोलिस तपास चालू आहे. वैद्यकिय अधिकारी व आरोग्य सेविका यांना निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे तावखेडा व निरगुडी (ता.शिंदखेडा जि.धुळे) या रस्त्यांच्या दुरावस्थेबाबत

(३८) ४१८२२ (०१-०४-२०२२). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तावखेडा प्र.बे. ते निरगुडी (ता.शिंदखेडा जि.धुळे) या रस्त्यांच्या कामाची अत्यंत दुरावस्था झाली असून या दोन्ही गावांच्या शेतकऱ्यांसह ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने नवीन रस्ता बनविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०६-२०२२) : (१) हे, खरे आहे.

(२) तावखेडा प्र.बे. ते निरगुडी (ता.शिंदखेडा, जि.धुळे) हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२८ दर्जाचा असून तावखेडा ते निरगुडी पर्यंतची लांबी ३.५०० कि.मी. एवढी आहे. त्यापैकी सा.क्र.०/०० ते १/०० लांबीतील रस्ता सुस्थितीत आहे. सा.क्र.१/०० ते ३/५०० या लांबीतील रस्ता दुरुस्त करणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषदेने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सदर रस्त्याचे काम प्रस्तावित केले असून निधीच्या उपलब्धतेनुसार रस्ता दुरुस्त करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रातील पथदिवे आणि पाणी पुरवठा योजनांची थकीत वीज देयके भरण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत

(३९) ४१९१६ (११-०४-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील ग्रामपंचायतींचे माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंतच्या पथदिवे आणि सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या वीज जोडण्यांच्या वीज देयकांची सुमारे १४७ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे माहे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू थकबाकीचा भरणा करण्यासाठी शासनाकडून पहिल्या टप्प्यात केवळ ३. ८१ कोटींचा निधी नागपूर जिल्हा परिषदेस प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील पथदिवे आणि पाणी पुरवठा योजनांची थकीत वीज देयके भरण्यासाठी उर्वरित निधी तातडीने वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. हसन मुश्रीफ (१५-०६-२०२२) :(१) हे अशंत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ग्रामपंचायतींच्या क्षेत्रातील पथदिवे आणि पाणीपुरवठा योजनांवरील वीज देयकांच्या थकबाकीचा आढावा घेण्याची कार्यवाही सुरू आहे.आढाव्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील पथदिवे आणि पाणीपुरवठा योजनांची थकित वीज देयके भरण्यासाठी वित्त विभागास निधीची मागणी करण्यात येईल.

(४) लागू नाही.

पालघर जिल्ह्यात मातामृत्यूचे प्रमाण वाढत असल्याबाबत...

(४०) ४२५३१ (१२-०४-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात गरोदरपणात स्त्रीयांना उपचार वेळेवर मिळत नसल्यामुळे मातामृत्यूचे प्रमाण वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार मातामृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) माता मृत्यु टाळण्यासाठी शासनामार्फत खालील प्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात :-

- गरोदरपणामध्ये लवकरात लवकर नोंदणी (१२ आठवडयाच्या), नियमित पाठपुरावा किमान ४ वेळा गरोदरपणी तपासणी, रक्तदाब, वजन रक्तातील हिमोग्लोबीन, लघवीतील साखर व प्रथिने याबाबत चाचणी, विशेष जोखमीच्या मातांचा तज्ञांमार्फत अतिरिक्त पाठपुरावा करण्यात येतो.
- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार निपी कार्यक्रमांतर्गत सर्व गरोदर तथा स्तनदा मातांना प्रसूतीपुर्व व प्रसूती पश्चात सहा महिने लोहयुक्त गोळया देण्यात येतात. सर्व प्रजननक्षम मातांना आठवडयाला एक याप्रमाणे वर्षाला ५२ लोहयुक्त गोळया देण्यात येतात. तसेच सर्व वयोगटातील मातांना जंतनाशक औषध देण्यात येते.
- राज्यातील सर्व गरोदर मातांच्या त्यांच्या प्रसूतीच्या अपेक्षित दिनांक व ठिकाणानुसार सर्व संस्थास्तरावर याद्या बनविण्यात येतात व प्रसूतीच्या दिनांकाच्या एक महिना अगोदरपासून संस्थात्मक प्रसूती होण्यासाठी आरोग्य यंत्रणेमार्फत पाठपुरावा करण्यात येतो. तसेच प्रसूतीपुर्व तपासणीच्या वेळी अतिजोखमीच्या माता ओळखून त्यांच्याही याद्या सर्व संस्थास्तरावर बनवून संनियंत्रण करण्यात येतात.
- तीव्र रक्ताक्षय असलेल्या गरोदर मातांच्या याद्या बनविण्यात येतात व त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यावरील शासकीय संस्थेमध्ये वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिरेद्वारे इंजेक्शन आयर्न सुक्रोज देण्यात येते. गरोदरपणी हिमोग्लोबीनचे प्रमाण ५ ग्रॅम टक्केपेक्षा कमी आढळल्यास अशा लाभार्थीला रक्त संक्रमण करण्यात येते.
- केंद्र शासनाच्या सूचनानुसार राज्यात दरमहिन्याच्या ९ तारखेला प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान राबविण्यात येते, यामध्ये चौथ्या ते नवव्या महिन्यातील गरोदर मातांची दोनदा तपासणी वैद्यकिय अधिकारी/तज्ञांमार्फत करण्यात येते. तसेच प्रयोगशाळा तपासण्या व सोनोग्राफी तपासण्या करण्यात येतात. विशेष जोखमीच्या माता शोधून उपचार व संदर्भसेवा देण्यात येतात. सर्व गरोदर मातांना बाळंतपणाच्या तयारी विषयी कुटुंब नियोजनाबाबत समुपदेशन करण्यात येते.
- गरोदर मातेच्या नोंदणीच्यावेळी सर्व गरोदर मातांसाठी एका बर्थ कॅपनियनची निवड करण्यात येते. या निवडलेल्या बर्थ कॅपनियनना गरोदरपणातील धोक्याच्या लक्षणाविषयी थोडक्यात माहिती देण्यात येते व अशी लक्षणे संबंधीत गरोदर मातेत आढळल्यास त्वरीत नजीकच्या दवाखान्यात मातेस घेऊन येण्याबाबत व उपलब्ध असलेल्या सेवांबाबत माहिती देण्यात येते. प्रसूतीच्या वेळी मातेस मानसिक आधार मिळावा म्हणून जंतुसंसर्गाची काळजी घेऊन या बर्थ कॅपनियनला प्रसूतीगृहात प्रवेश देण्यात येतो.
- सर्व गरोदर मातांना संस्थेमध्ये बाळंतपणासाठी प्रवृत्त करण्यात येते. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आरोग्य संस्थांचे डिलिव्हरी पॉईंटमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. लेव्हल-१ मध्ये उपकेंद्रे व काही प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश आहे, लेव्हल-२ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र व काही ग्रामीण रुग्णालयांचा समावेश आहे व लेव्हल -३ मध्ये

जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, सामान्य रुग्णालये, उप जिल्हा रुग्णालये व काही ग्रामीण रुग्णालयांचा समावेश आहे. या ठिकाणी सिझेरियन शस्त्रक्रिया व रक्तसंक्रमणाची सोय करण्यात येते.

- बाळंतपणानंतर गरोदर मातांना किमान ३ दिवस आरोग्य संस्थेमध्ये वास्तव्य करण्याबाबत सूचना देण्यात येतात, जेणे करुन प्रसूती पश्चात गुंतागुंत, बाळाचे आरोग्य, लसीकरण या बाबींची काळजी घेणे सोयिस्कर होते. त्याच प्रमाणे या ३ दिवसांच्या कालावधीत स्तनपान, मातेचा आहार कुटुंब नियोजनांच्या साधनांबाबत व आरोग्य इ. संबंधी सर्व माहिती मातांना देण्यात येते.
- जननी सुरक्षा योजना - या योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील सर्व गर्भवती मातांना शासकीय संस्था अथवा शासन मानांकित संस्थेत प्रसूती झाल्यानंतर आर्थिक लाभ दिला जातो.
- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम -

या कार्यक्रमांतर्गत गरोदर व प्रसूतीपश्चात ४२ दिवसापर्यंतच्या मातांना घर ते दवाखाना, दवाखाना ते घर मोफत वाहतूक सेवा, दवाखान्यात कोणत्याही प्रकारचे रुग्ण शुल्क घेतले जात नाही, मोफत प्रयोगशाळा तपासण्या, रक्त संक्रमण व औषधोपचार केला जातो, मोफत प्रसूती व सिझेरियन सेक्शन केले जाते व शासकीय संस्थेत साधारण प्रसूतीसाठी ३ दिवस व सिझेरियन प्रसूतीसाठी ७ दिवस मोफत आहार दिला जातो.

- मातृत्व अनुदान योजना -

नवसंजीवनी योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्हयामध्ये १९९७ -९८ पासून राबविण्यात येते. या जिल्हयातील गरोदर माता प्रसूतीपुर्व तपासणीकरीता शासकीय आरोग्य संस्थेत आल्यास रु.४००/- इतका आर्थिक लाभ दिला जातो व रु.४००/- पर्यंतची औषधे मोफत दिली जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भाटीपाडा तालूक्यातील (ता. जव्हार, जि. पालघर) येथील गरोदर महिलेची होत असलेली गैरसोय

(४१) ४२५४८ (०१-०४-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाटीपाडा (ता. जव्हार, जि. पालघर) तालूक्यातील मुख्यमंत्री फॉलोशीप योजने अंतर्गत दत्तक घेतलेल्या ग्रामपंचायतीच्या अंतिम असून येथील हद्दीतील असून पाथर्डी एका गर्भवती महिलेला दिनांक २ फेबुवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास अचानक पोटात दुखायला लागल्याने तिला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यासाठी भाटीपाडा गावा ते पाथर्डी सोल्याचा पाडा पर्यंत येण्यासाठी रस्ताच नसल्यामुळे सदर महिलेच्या नातेवाईकांनी लाकडाचा डोली बांधून जवळपास ०८ किमीचा खडतर प्रवास करावा लागला तद्नंतर प्राथमिक आरोग्य केंद्र साकुर रुग्णालयाच्या ठिकाणी पोहोचवावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी भागातील बहुसंख्य गावांना रस्त्याअभावी विविध समस्यांना सामोरे जावे लागते तसेच व मुलभूत सोयी सुविधा पासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर आदिवासी गावे विनाविलंब पक्के रस्त्यांना जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०७-०६-२०२२) : (१) व (२) अशंत: खरे आहे.
(३) जव्हार तालुक्यातील पाथर्डी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भाटीपाडा हा पाडा अतिदुर्गम असून ग्रामीण मार्ग १९३ चा भाग आहे. सदर भाटीपाडयापासून सोलेपाडयापर्यंत चा अंदाजे ४.०० कि.मी. लांबीचा कच्चा रस्ता अतितीव्र डोंगर उताराचा आहे. त्यापैकी ३.०० कि.मी. रस्त्याचा भूभाग हा वन विभागाकडे आहे. उर्वरीत १.०० कि.मी. लांबीचा भूभाग हा खाजगी जमिनीतून जातो. पुढे सोळेपाडयापासून पाथर्डी मार्गे साकूर प्राथमिक आरोग्य केंद्र पर्यंतचा रस्ता ४.०० कि.मी.लांबीचा पक्का पृष्ठभागाचा असून वाहतूकीसाठी सुस्थितीत आहे.

सुरवातीच्या ४.०० कि.मी. कच्या रस्त्याचे लांबीचे काम म.ग्रा.रो.ह.यो २०२१-२२ अंतर्गत आराखडयात समाविष्ट आहे. सदर सा.क्र.०/०० ते ३/०० हे क्षेत्र वन जमिनीमध्ये येत असल्याने ग्रामपंचायती मार्फत रस्ते कामासाठी प्रस्ताव मंजूरीसाठी वन विभागाकडे सादर केला आहे. तसेच सा.क्र.३/०० ते ४/०० हे खाजगी मालकी क्षेत्र असल्याने संबंधित व्यक्तींची संमती घेवून त्यावर मग्रारोहयो अंतर्गत रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

तसेच जिल्हा परिषदेद्वारे अपृष्ठांकित रस्ते या लेखाशिर्षाखाली पाथर्डी डोंगरपाडा ते भाटीपाडा मनमोहडी रस्ता (ग्रामा.१९३) नविन रस्ता तयार करणेसाठी रु.७५.०० लक्ष रस्क्कमेकरीता नियोजन आराखडयामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर शहरात नियोजित ताडी दुकानांविरोधात रोष वाढत असल्याबाबत

(४२) ४२७५२ (२९-०३-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरात नियोजित ताडी दुकानांविरोधात रोष वाढत असून शहरातील नागरिक याविषयी तकारी करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार शहरातील विविध पक्ष व नागरिक एकत्र येऊन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्दअनुषंगाने सदर ताडी दुकानांविरोधात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. अजित पवार (०१-०६-२०२२) : (१), (२) व (३) शासन निर्णय दि.३०.८.२०२१ अन्वये नवीन ताडी धोरण मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानुसार ताडी अनुज्ञप्ती व नूतनीकरण करण्याकरिता लिलाव-नि-निविदा व नूतनीकरण पध्दतीचा अवलंब करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

सोलापूर शहरात १४ ताडी दुकाने लिलाव-नि-निविदा या पध्दतीद्वारे ऑनलाईन प्रक्रियेद्वारे मंजूर करण्यात आली आहेत. या १४ दुकानांपैकी ८ ताडी दुकानांबाबत एकही तक्रार प्राप्त झालेली नसल्यामुळे त्या दुकानांना अनुज्ञप्ती प्रदान करण्यात आलेली आहे.

निलम नगर येथील ताडी दुकानाबाबत तक्रार प्राप्त झाल्यामुळे जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे सुनावणी होवून सबंधिताला नवीन जागा सुचविण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, अशोक चौक येथील ताडी दुकानाबाबत तक्रार प्राप्त झाल्यामुळे जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे सुनावणी होवून कायदा व सुव्यवस्थेबाबतचा अहवाल पोलीस विभागाकडून मागविण्यात आलेला आहे. उर्वरित ४ ठिकाणांच्या दुकानांच्या जागेच्या पडताळणीअंती व नागरिकांच्या तक्रारी विचारात घेऊन जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून उचित निर्णय घेण्यात येणार आहे.

शासनमान्य ताडी दुकाने सरसकट बंद ठेवल्यास गैरमार्गाने ताडी विक्री केली जाण्याची व विषारी ताडी सेवनामुळे जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता योग्य ती दक्षता घेण्याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना कळविण्यात आलेले आहे.

ताडी दुकानातील नमुने वेळोवेळी घेवून त्याची पडताळणी करण्याचे निर्देश अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर या कार्यालयाकडून त्यांच्या अधिनस्थ अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. यास अनुसरुन सन २०२१-२२ या ताडी वर्षामध्ये ताडी दुकानातून एकूण ४३ ताडी नमूने घेतले आहेत. यापैकी ३७ ताडी नमूने हाफकीन प्रशिक्षण संस्था यांचेकडे विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले असून यापैकी ५ ताडी नमून्याचा विश्लेषण अहवाल प्राप्त झाला आहे. या प्राप्त झालेल्या विश्लेषण अहवालामध्ये कोणत्याही आक्षेपार्ह बाबी आढळून आलेल्या नाहीत.

तसेच, ज्या ताडी दुकानाबाबत तक्रारी येतात त्या दुकानांचे सुक्ष्म निरीक्षण करून आक्षेपार्ह आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्याचे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांना निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खेड (जि. पुणे) तालुक्यातील कळमोडी उपसा जलसिंचन योजना अद्यापही राबविण्यात आली नसल्याबाबत

(४३) ४२७६८ (१२-०४-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि. पुणे) तालुक्यातील कळमोडी धरण बांधून अनेक वर्षाचा काळ लोटल्यानंतरही खेड व आंबेगाव तालुक्यातील सुमारे ५ हजार हेक्टर जमिन शाश्वत सिंचनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळमोडी उपसा जलसिंचन योजनेला सन १९९७ मध्ये मंजुरी मिळाल्यानंतर आंबेगाव तालुक्यातील सातगाव पठार भागातील ३ हजार ४४० हेक्टर व खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील १६२५ हेक्टर क्षेत्रासाठी जलसिंचन योजना प्रस्तावित असताना अद्यापही सुमारे ५ हजार हेक्टर इतकी जमिन शाश्वत सिंचनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेसाठी निवेदने व आंदोलनाच्या माध्यमातून मंत्रालय पातळीवर सातत्याने स्थानिक सामाजिक कार्यकर्ते पाठपुरावा करित असूनही अद्याप कळमोडी उपसा जलसिंचन योजना राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कळमोडी योजनेतून खेड तालुक्याच्या पुर्व भागातील व थिटेवाडी बंधारा लाभक्षेत्रातील गावाचे सर्वेक्षण करुनही गावे का वगळण्यात आली असून सदरहू गावांसाठी जलसिंचन योजना मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदरहू योजना राबविण्यात दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयंत पाटील (१३-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. कलमोडी मध्यम प्रकल्पांतर्गत खेड तालुक्यातील १६२५ हे. आणि आंबेगाव तालुक्यातील ३४४० हे. असे एकूण ५०६५ हे. सिंचन क्षेत्र सुप्रमा मान्यते अभावी वंचित आहे.
(३) सुप्रमाच्या मान्यतेअभावी सदर योजना कार्यान्वीत करणे शक्य झाले नाही.
(४) सदरचे मागणी केलेले क्षेत्र कलमोडी प्रकल्पाच्या मंजूर अहवालाच्या लाभक्षेत्रात येत नाही. तथापि, स्थानिकांच्या मागणीच्या अनुषंगाने व तत्कालीन राज्यमंत्री, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२/०१/२०१९ व दिनांक २६/०२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार खेड तालुक्याच्या पूर्व भागातील व थिटेवाडी बंधारा लाभक्षेत्रातील गावांचे सर्वेक्षण करुन अतिरिक्त क्षेत्राचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर शासनाच्या दिनांक ०४/०२/२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुषंगाने कलमोडी प्रकल्पाचा प्रथम सुधारित प्रस्ताव तयार करुन SLTAC यांना सादर करण्यात आला असून शेरे पुर्तता अहवाल कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय कार्यालयात पदे रिक्त भरण्याबाबत

(४४) ४२८०३ (१२-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचारी, शासकीय अनुदान प्राप्त संस्था आणि शासकीय महामंडळे यांची ४० टक्के पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यन निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय कार्यालयातील रिक्त पदांमुळे कामांचा ताण वाढत आहे, ही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी आढावा घेऊन राज्यातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (०८-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे. माहे डिसेंबर, २०१९ अखेरच्या उपलब्ध आकडेवारीनुसार शासकीय आणि जिल्हापरिषद कार्यालयांमधील गट अ, ब, क व ड या संवर्गातील एकूण १०,९९,१०४ पदांपैकी अंदाजे २,००,१९३ इतकी पदे रिक्त आहेत.
(२) नाही. उपलब्ध कर्मचारी, संगणक आणि ऑनलाईन कामकाज/ बैठका इत्यादींच्या आधारे प्रशासकीय कामकाज करण्यात येत आहे.
(३) वित्त विभागाच्या दि.१२.४.२०२२ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीसाठी काही प्रमाणात सुट देण्यात आली आहे. त्यानुसार रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागांकडून करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील काही जिल्हयांमधील नदयांभोवती गाव व वस्त्यांच्या ठिकाणी संरक्षक भिंती उभारण्याबाबत

(४५) ४२९५७ (३१-०३-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही जिल्हयांमध्ये सातत्याने नदयांना पूर येऊन नागरीकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते त्यामुळे पूररेषा वारंवार ओलांडणाऱ्या नदयांभोवती गाव व वस्त्यांच्या ठिकाणी संरक्षक भिंती उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे व योजनेची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय निदर्शनास आले, तद्अनुषंगाने सदर ठिकाणी संरक्षक भिंती उभारण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१६-०६-२०२२) : (१) होय हे खरे आहे,
नदी किंवा नाल्यात पावसामुळे येणा-या विर्सगामुळे पूर प्रवाह काठ सोडून आजुबाजुच्या परिसरात पसरतो, त्याला अटकाव करून संरक्षण करण्यासाठी पूर संरक्षक कामांबाबतचे धोरण शासन जलसंपदा विभागाने दि.३१.०८.२०१९ च्या निर्णयान्वये निश्चित केले असून आवश्यकतेनुसार पूर संरक्षक भिंतीची कामे करण्यात येतात.

(२) शासन निर्णय दि.३१.०८.२०१९ नुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागणी व क्षेत्रीय पाहणी करून आवश्यकतेनुसार याबाबतचे सर्वेक्षण व संकल्पन करून पूर संरक्षक कामांचे सविस्तर प्रस्तावास शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर अंमलबजावणी करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विशेष (गतीमंद/मतीमंद) युवक, व्याधीग्रस्त आणि वयोवृद्ध, विकलांग व्यक्ती कोविड प्रतिबंधक लसीकरणाबाबत

(४६) ४३०३४ (२४-०४-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड प्रतिबंधक लसीकरणासाठी विशेष (गतीमंद/मतीमंद) युवक, अंथरुणाला खिळून असणारे व्याधीग्रस्त आणि वयोवृद्ध, विकलांग व्यक्तींकरिता वेगळी तरतूद नसल्यामुळे हा वर्ग लसीकरणापासून उपेक्षित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लसीकरणामध्ये विशेष (गतीमंद/मतीमंद) युवक, अंथरुणाला खिळून असणारे व्याधीग्रस्त आणि वयोवृद्ध, विकलांग यांच्यासाठी वेगळी व्यवस्था करून तातडीने लस उपलब्ध करून देण्याची मागणी पालक आणि विविध स्वयंसेवी संस्थांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
केंद्र शासनाच्या दि. ६ मे २०२१ रोजीच्या पत्रान्वये बेघर, भटके, रस्त्यावर राहणारे नागरीक, कोणतेही फोटो ओळखपत्र नसलेले नागरीक, मानसिक रुग्ण यांच्या लसीकरणाबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन अंथरुणाला खिळलेल्या - शारीरीक हालचाल करता न येणा-या व्यक्तींसाठी घरी जाऊन कोविड-१९ लसीकरणाची कार्यवाही करण्यात येत आहे
(२) हे खरे नाही.
(३) दि. ३० एप्रिल, २०२२ अखेर अंथरुणांना खिळलेल्या व शारीरीक हालचाल करता न येणा-या ७५,४८५ व्यक्तींना पहिला डोस व ४२,४५३ व्यक्तींना दुसरा डोस देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदूरफाटा ते पांढऱ्याचीवाडी, (ता.जि. बीड) तसेच भावठाणा ते सोनवळा, (ता.अंबाजोगाई, जि. बीड) कामाला मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबत

(४७) ४३५८८ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूरफाटा ते पांढऱ्याचीवाडी, (ता.जि. बीड) तसेच भावठाणा ते सोनवळा, (ता.अंबाजोगाई, जि. बीड) या ग्रामीण भागातील रस्ता खराब आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ता हा शेतकरी व नागरिकांना दळणवळणासाठी महत्वाचा असल्याने सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाला मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर रस्त्याच्या मंजुरीसाठी तसेच निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (०३-०६-२०२२) : (१), (२), (३) व (४) नांदूरफाटा ते पांढऱ्याचीवाडी, (ता.जि. बीड) हा रस्ता प्रजिमा-४० असा असून सदर रस्ता प्रजिमा दर्जाचा असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येत असल्याने मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मंजुर करता येणे शक्य नाही.

भावठाणा ते सोनवळा, (ता.अंबाजोगाई, जि. बीड) हा रस्ता इजिमा-८५ दर्जाचा असून मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ च्या निकषानुसार, शक्य झाल्यास या रस्त्याचे काम हाती घेण्याचे प्रयत्न राहतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत आयुर्वेद पदवीधारकांच्या पदोन्नतीबाबत

(४८) ४३६८९ (०७-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी गट अ व ब संवर्गातील पदे रिक्त असून तेथे आयुर्वेद पदवीधारकांना पदोन्नती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुर्वेद पदवीधारकांना पदोन्नती देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१७-०६-२०२२) : (१) व (२) हे अंशत: खरे आहे. वैद्यकीय अधिकारी गट अ (वेतनस्तर एस २०) यांची रिक्त पदे स्वतंत्र निवड मंडळाच्यावतीने दि.३० जून २०२१ ते दि.०३ जुलै, २०२१ व दि.०१.०९.२०२१ ते दि.०६.०९.२०२१ या कालावधीमध्ये समुपदेशनाने भरतीप्रक्रियेव्दारे भरण्यात आलेली आहेत.

शासन निर्णय दि.१७.१०.२०१४ नुसार जिल्हा तांत्रिक संवर्गातील ८६९ वैद्यकीय अधिकारी वर्ग-३ यांचे सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी गट ब या पदावर समावेशन झालेले आहे. तसेच शासन अधिसूचना दि. ११.०१.२०१९ नुसार ७१८ अस्थायी वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय अधिकारी गट-ब या पदावर समावेशन झालेले आहे. सदर वैद्यकीय अधिकारी यांची सेवा ज्येष्ठतासूची व बिंदूनामावली तयार करण्याबाबतची कार्यवाही आयुक्तालयस्तरावर सुरू आहे. ती अद्ययावत होताच पदोन्नतीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

जलसंपदा विभागात प्रत्यार्पित करण्याचे शासन आदेश काढूनही
सदर आदेशाची अंमलबजावणी न केल्याबाबत

(४९) ४३९५४ (११-०४-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मृद व जलसंधारण विभागाने उपविभागीय जलसंधारण अधिकारी, परभणी यांना मुळ जलसंपदा विभागात प्रत्यार्पित करण्याबाबतचे शासन आदेश दिनांक २१.८.२०१८ व दिनांक ३०.६.२०२१ मध्ये काढूनही अद्याप त्यांची बदली मूळ विभागात करण्यात आली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.कच्छवा यांना जिल्हाधिकारी, परभणी यांनी निलंबित केले तो १४ महिन्याचा कालावधी प्रशासनाने नियमित न करता शासनाची दिशाभूल केली आहे तसेच श्री.कच्छवा हे मागील पाच वर्षापासून जलसंधारण विभागात कार्यरत असून ते बदलीस पात्र असतानाही त्यांची बदली मूळ जलसंपदा विभागात न करण्याची सर्वसाधारण कारणे काय,

(३) तसेच सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने शासन आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शंकरराव गडाख (०१-०६-२०२२) : (१) होय, हे अंशत:खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, परभणी यांचे दि.०३/०४/२०१९ रोजीचे निलंबन आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३/०९/२०१९ चे आदेशान्वये रद्द केल्याने त्यांना जिल्हाधिकारी यांनी सेवेत पुन:स्थापित केले. श्री.कच्छवा यांचे बदली आदेशांना महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे दि.८/१०/२०१८ व दि.०१/०७/२०२१ च्या आदेशान्वये स्थगिती दिल्याने बदली आदेशांची अंमलबजावणी होवू शकली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

बोगस पावत्या सादर करीत टॅक्स क्रेडीट मिळविणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणेबाबत

(५०) ४४५०७ (२५-०४-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मे. एव्हरंट फेरोमॅट प्रा.लि. कंपनीने मेटल व स्क्रॅप चे व्यवहार करणारे करदाते अस्तित्वात नसलेल्या डीलर कडून बोगस पावत्या स्वीकारत कोट्यावधी रुपयांचे बनावट इनपुट टॅक्स क्रेडीट मिळविल्याचे धक्कादायक बाब माहे १८ फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभागाचे कर फसवणूक करणाऱ्या सदर मे. एव्हरंट फेरोमॅट प्रा.लि. कंपनीच्या संचालकांवर बोगस पावत्या सादर करून कोट्यावधी रुपयांचे टॅक्स क्रेडीट मिळविल्याबाबत सदर कंपनीवर कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, सदर कंपनीच्या संचालक मंडळावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, राज्यातील बनावट बिलांच्या बोगस पावत्या सादर करीत टॅक्स क्रेडीट मिळविण्याचा गैरव्यवहार करून शासनाची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांच्या संचालकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) तसेच बनावट बिलांच्या बोगस पावत्या सादर करीत टॅक्स क्रेडीट मिळविणाऱ्यांवर प्रतिबंध करण्याकरिता शासन स्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार (०१-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मे. एव्हरंट फेरोमेंट प्रा.लि. (GSTN २७AAECE२६०R१ZB) या कंपनीचा नोंदणी दाखला रद्द करण्यात आलेला असून संबंधित कंपनी बाबत पुढील कारवाई करण्याच्या दृष्टीने राज्यकर अधिकारी (नोडल अधिकारी) नवी मुंबई, यांना कळविण्यात आले आहे.

(३) मे. एव्हरंट फेरोमॅट प्रा.लि. (GSTN २७AAECE२६०R१ZB) या कंपनीचे संचालक (अधिकृत स्वाक्षरीकर्ता) श्री. दीपक सुरेशकुमार कारिया यांनी अस्तित्वात नसलेल्या व्यापाऱ्याकडून रुपये १५२ कोटीची बोगस बिले घेऊन २७.८३ कोटी रुपयाचा बोगस इन पूट टॅक्स क्रेडीट चा वापर करदायित्व भरण्यासाठी (offset tax liability) केल्याचे निदर्शनास आले. त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर कायदा २०१७ च्या कलम १३२ (१) (बी), (सी) आणि (एल) अन्वये सदरहू गुन्हयाप्रकरणी श्री. दिपक सुरेशकुमार कारिया याच्यावर दि. १७/०२/२०२२ रोजी अटकेची करवाई करण्यात आली. व श्री. दिपक सुरेशकुमार कारिया, संचालक यांना मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ८ वे न्यायालय, एस्प्लेनडे, मुंबई यांचे समोर हजर केले गेले. सदरहू संचालकास २महिन्यांच्या न्यायालयीन कोठडीनंतर दि.१८/०४/२०२२ रोजी सशर्त जामीन मंजूर केला असून सदर प्रकरण सद्या न्यायप्रविष्ट आहे.

(४) या कार्यालयाने बोगस कंपन्यांमार्फत खोटे व्यवहार टॅक्स क्रेडीट घेतलेल्या करदात्यांविरोधात वस्तू व सेवाकर कायद्याअंतर्गत कारवाई करुन त्यांचे जीएसटी नोंदणी क्रमांक, नोंदणी दाखला घेतल्याच्या दिनांकपासून (ab-initio) रद्द करुन त्यांना Non Genuine Taxpayer म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

(५) अशा व्यवहारांवर प्रतिबंध घालण्यासाठी अशा कंपन्यांच्या सुत्रधारांचा शोध घेवून त्यांच्यावर अटकेची कारवाई करुन खटला दाखल करण्यात येतो.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.